# जाहिरात

**भारत सरकारची (सेंट्रल सेक्टर) महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांकरिता**

**शिष्यवृत्ती योजना सन २००८-२००९**

सचिव,राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळ यांनी मार्च, २००८ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक (बारावी १०+ २ स्तर) शालांत परीक्षेमध्ये कला वाणिज्य व विज्ञान या विद्याशाखांमध्ये किमान ८० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे पूर्णकाल पदवी व पदव्युत्तर शिक्षणासाठी भारत सरकारने महाविद्यालयीन व विद्यापीठ शिक्षण शिष्यवृत्ती योजना सन २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून सुरु केलेली आहे. त्याकरिता कला वाणिजय व विज्ञान या तीनही विद्याशाखांच्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षा सन २००८ मध्ये किमान ८० टक्के गुण प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

**१ अर्जदार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.**

**२. मार्च २००८ मध्ये घेतलेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये किमान ८० टक्के गुण असावेत.**

**३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा/स्टायपेंडचा लाभार्थी नसावा.**

**४. अर्जदार नॉन क्रिमीलेअर वर्गात बसणारा असावा.**

**५. अर्जदाराचे/त्याच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.४.५० लाखापेक्षा अधिक नसावे.**

**६. ही शिष्यवृत्ती पदवी व पदव्युत्तर व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी आहे.**

**योजनेची सविस्तर माहिती व अर्जाचा नमुना** : - या शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती,अर्जाचा नमुना,अर्ज करावयाची पध्दती,पात्रता व विद्यार्थ्यांनी महाविद्यालय/संस्था यांचेमार्फत अर्ज सादर करावयाचे वेळापत्रक इ.माहिती www.dirhe.org.in तसेच www.education.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.विद्यार्थ्यांनी या संकेत स्थळावरुन अर्ज डाऊनलोड करुन आणि पूर्ण भरुन त्यांचे महाविद्यालय/संस्थेमध्ये सादर करावायाचा अंतिम दिनांक **२५ फेब्रुवारी २००९** असा आहे. सर्व संबंधित महाविद्यालये/संस्था यांनी सर्व प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन

संचालनालयाच्या अधिपत्याखालील संबंधित विभागीय कार्यालये (मुंबई,पुणे,कोल्हापूर,जळगांव,औरंगाबाद,नांदेड,अमरावती व नागपूर) यांचेकडे दिनांक १.३.२००९ पर्यंत सादर करावी.विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये केंद्र शासनाकडून जमा करण्यात येणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी त्याच्या अर्जामध्ये बँक खात्याचा परिपूर्ण बिनचूक तपशील नमूद करणे आवश्यक आहे.सदरील तपशील भरण्यात विद्यार्थ्यांकडून चूक झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

**विहित कालावधीत संस्थेमार्फत प्राप्त झालेल्या अर्जांचाच विचार केला जाईल. विद्यार्थ्यांकडून परस्पर प्राप्त झालेले अर्ज किंवा अपूर्ण अर्ज अस्विकृत करुन फेटाळले जातील याची कृपया नोंद घ्यावी.**

**सही**

**(डॉ.आर.व्ही.किर्दक)**

**शिक्षण संचालक,उच्च शिक्षण,**

**महाराष्ट्र राज्य,पुणे-१.**

**संपर्क दुरध्वनी क्रं.** दूरध्वनी क्र.०२०/२६१६१३३९/२६१२१११९/२६१३०६२७/२६०५१५१२

फॅक्स नं.०२०/२६११११५३